# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### एकदरा (ता.मुरुड, जि.रायगड) येथील खाडीतील गाळ काढणेबाबत

**(१) ७६६६ (०६-०४-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकदरा (ता.मुरुड, जि.रायगड) येथे ४०० ते ५०० नौका मच्छिमारी करीत असून खाडीमध्ये गाळ साचल्याने यांत्रिकी बोटींचे नुकसान होऊ नये म्हणून गाळ काढणेबाबत परिसरातील मच्छिमार संस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१८) :** (१) व (२) एकदरा (ता.मुरुड) येथे खाडीतील एकूण ७१,५०० घनमीटर गाळ काढणे आवश्यक आहे. सदर गाळ काढण्याच्या कामासाठी रु.२.८६ कोटी इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. एकदरा हे मत्स्य बंदर असल्यामुळे येथील खाडीतील गाळ काढण्याकरीता मत्स्य व्यवसाय विभागाकडून आवश्यक निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक निधी रु.२.८६ कोटींची मागणी आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दि.०२.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### देवगड (जि.सिंधुदुर्ग) बंदरामध्ये व देवगड तालुक्यातील खाड्यांमध्ये गाळ साचून खाड्यांची मुखे बंद पडत असल्याबाबत

**(२) ३४६१५ (०८-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड बंदरामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचून खाड्यांची मुखे बंद पडण्याची शक्यता असून बंदर धोकादायक होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवगड तालुक्यातील तारामुंबरी आणि तांबळडेग खाड्यांमधील गाळाची समस्या गंभीर बनली असून दिवसेंदिवस खाडीमध्ये गाळ वाढत चालला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाड्या गाळाने भरुन गेल्यामुळे मच्छिमारी नौकांसाठी व बंदरे यांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार खाड्या व बंदरातील गाळ काढण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१८) :** (१) , (२) व (३) होय.
(४) देवगड तालुक्यातील तारामुंबरी आणि तांबळडेग ही मत्स्य बंदरे असल्यामुळे येथील खाडीमधील गाळ काढण्यासाठी अस्तित्वातील गाळाचे जलसर्व्हेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्याबाबत तसेच यासाठी लागणा-या निधीची मागणी मत्स्य व्यवसाय विभागास करण्याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास दिनांक २५.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये आदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायतीतील नेटवर्कचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(३) ५४४९० (२९-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागात जलद सेवेसाठी बीएसएल ने नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क हा प्रकल्प गेल्या वर्षी सुरु करुनही जळगांव व सांगली जिल्ह्यातील ग्रामपंचायती अद्यापही या नेटवर्कशी जोडल्या गेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या फेजमध्ये केवळ २५० कि.मी. चे झालेले कामही अद्याप अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची कामे अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्यातील ग्रामपंचायती "हायटेक" करण्याकरिता नेटवर्कचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असलेला National Optical Fiber Network (NOFN) हा प्रकल्प सन २०१५ मध्ये सुधारित करून त्याला भारतनेट से नाव देण्यात आले.

अपुर्ण काम भारतनेट प्रकल्पामार्फत सुधारणेसह राबविण्यात येणार आहे. तसेच NOFN मार्फत राज्यातील एका जिल्ह्यातील नेटवर्कचे कार्य केंद्र शासनाच्या निर्देशानुसार पूर्ण करण्यात आले. उर्वरीत जिल्ह्यातील अपूर्ण कार्य भारतनेट प्रकल्पामार्फत पूर्ण करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंत्रालयातील संगणक यत्रणेत ' लॉकी रॅल्सम' नावाच्या व्हायरसमुळे महत्वाच्या प्रकरणांची माहिती खराब झाल्याबाबत**

**(४) ५६९३० (२३-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालयातील संगणक यत्रणेत 'लॉकी रॅल्सम' नावाचा व्हायरस घुसल्याने महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व संगणक खराब झाल्याचे दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर व्हायरसमुळे महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागातील महत्वाच्या प्रकरणांची माहिती व त्यावरील कार्यवाही खराब झाल्याने अनेक महत्वाची कामे खोळंबली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर व्हायरस काढण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागातील Sharing केलेल्या काही संगणकावरील डेटा करप्ट झाला होता.
(३) सदर व्हायरस काढण्याकरिता अद्यावत Antivirus यंत्रणा मंत्रालयातील सर्व संगणकावर स्थापित केली आहे. तसेच अशा प्रकारच्या हल्ल्यापासून सुरक्षित ठेवण्याकरिता सायबर सेल यंत्रणा राबविली असून अशा हल्ल्यांच्या आधीच सुरक्षेचे उपाययोजनाबाबत अग्रीम सूचना देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथे अद्‌यावत अभ्यासिका उभारण्याबाबत**

**(५) ७३७६८ (२७-०१-२०१७). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्‌योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) हे एक शैक्षणीक क्षेत्रात विकसीत गाव असून या ठिकाणी जिल्ह्यातील आजूबाजूच्या परिसरातील हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी येत असल्याने, याठिकाणी शिकणा-या विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेसाठी अभ्यासिका उभारणे गरजेचे असल्याची मागणी या परिसरातून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर युवक युवतींना स्पर्धा परिक्षेच्या तयारीकरिता अद्यावत अभ्यासिका उभारण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२२-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात येणाऱ्या बेरोजगारांना विविध व्यवसाय मार्गदर्शन साहित्य, स्पर्धा परीक्षांची माहिती देणारे मासिके, पुस्तके इ. उपलब्ध करुन देणे अभ्यासिकेची व्यवस्था करणे व वेबसाईटद्वारे नवीन-नवीन संधीची व रोजगाराची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता ३५ जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ६ विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र आणि ८ आदिवासी उमेदवारांकरितांचे मार्गदर्शन केंद्र अशा एकूण ४९ कार्यालयांमध्ये राबविण्याकरिता शासन निर्णय दि. ३.१.२००८ अन्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कारागृह विभागात १०६४ पदे रिक्त असल्याबाबत

**(६) ७३९२८ (२०-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कारागृहांमध्ये १०६४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमध्ये उपमहानिरिक्षका पासुन ते तुंरूग अधिकाऱ्यांपर्यतची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ५४ कारागृहामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्यामुळे उक्त सर्व रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१८) :** (१) जानेवारी २०१७ अखेर कारागृह विभागामध्ये एकूण ७४९ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) कारागृह विभाग हा संवेदनशील विभाग असल्याने व कारागृह सुरक्षा मजबूत करण्याच्या दृष्टीने रिक्त असलेली पदे ५०% ऐवजी १००% पदे भरण्याच्या अनुषंगाने HPC ची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच कारागृह शिपाई संवर्गातील २२६ रिक्त पदे भरण्यास दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली असुन संबंधीत पोलीस घटक प्रमुख यांच्या स्तरावर भरती प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या सन २०१५ च्या अहवालानुसार राज्यात महिलांवरील अत्याचारात वाढ झाल्याबाबत**

**(७) ७५२२० (२०-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला विनयभंगाच्या ११७१३ व बलात्काराच्या ४१४४ घटना घडल्याचे राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाने (एन.सी.आर.बी.) दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी जाहिर केलेल्या सन २०१५ च्या गुन्हे नोंदणी अहवालात नमुद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिलांवरील वाढत्या अत्याचाराची, बलात्काराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी २७ विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ पर्यंतच्या बलात्काराच्या घटनांमधील किती खटले शासनाने विशेष न्यायालयाकडे वर्ग केले आहेत व किती खटले जलदगती न्यायालयाने निकाली काढले आहेत व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३)

| विशेष न्यायालय | | | | जलदगती न्यायालय | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | सन २०१४ | सन २०१५ | सन २०१६ | वर्ष | सन २०१४ | सन २०१५ | सन २०१६ |
| वर्ग केलेले खटले | १८४२ | २४१५ | २३१८ | वर्ग केलेले खटले | १९९ | १६५ | १३५ |
| निकाली निघालेली एकूण | ६३० | ५५३ | ४६९ | निकाली निघालेली एकूण | ५४ | ३२ | २८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रलंबित खटले | १२१२ | १८६२ | १८४९ | प्रलंबित खटले | १४५ | १३३ | १०७ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरारोड (मुंबई) येथील बोगस कॉल सेंटरवर कारवाई करणा-या अधिका-यांने आरोपीकडून लाच मागीतल्याबाबत**

**(८) ७५८१६ (२१-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमेरिकन नागरिकांना कोटयावधीचा गंडा घालणा-या मिरारोड येथील बोगस कॉल सेंटरवर ठाणे गुन्हे शाखेने कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे गुन्हे शाखा युनिट-१ मध्ये कार्यरत असलेले सहा. पो.नि. यांना आरोपीकडून लाच मागितल्याप्रकरणी निलंबित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, निलंबित पोलीस अधिका-यांची लाचलुचपत प्रतिबंध विभागामार्फत संपत्तीची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) होय.

(४) नाही.

(५) प्रस्तुत प्रकरणी अद्याप चौकशी सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्हान (जि.नागपूर) शहरात व परिसरात महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत**

**(९) ९२००० (०४-०९-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील कन्हान शहरात व परिसरात मोठ्या प्रमाणावर चोरीच्या घटना वाढल्याचे माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या चोरीच्या घटनांमुळे महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यास चोरीचे प्रमाण कमी होईल यासंदर्भाचे निवेदन मा.पालकमंत्री व जिल्हा पोलीस अधिक्षक यांना व्यापारी संघातर्फे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) सन २०१६ चे तुलनेत माहे मे २०१७ पर्यंत चोरीच्या गुन्ह्यात वाढ झालेली आहे. चोरीचे वाढते प्रमाणावर आळा घालण्याकरिता नियमित कोम्बींग ऑपरेशन, नाकाबंदी, ऑफीसर ऑल-आउट, पोलीस ठाणे व हायवे पेट्रोलींग मोहिम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सर्व ठाणे प्रभारी यांना पोलीस ठाणे परिसरात तसेच सार्वजनिक गर्दीचे व संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेण्याची कार्यवाही करणेबाबत पोलीस अधिक्षक, नागपूर (ग्रामीण) यांनी आदेश जारी केले आहेत. तसेच कन्हान शहर अंतर्गत आंबेडकर चौक येथे १ डोम कॅमेरा व सराफा ओळीत ५ व पोलीस ठाणे कन्हान परिसरात ५ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असून सदर कॅमेरे कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील जिओ इंडिया ऑन लाईन कंपनीने गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(१०) ९४९४० (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत गुंतवणूकदारांना अधिक व्याजाचे प्रलोभन दाखवून ऑन लाईन पध्दतीने फसवणूक करणाऱ्या जिओ इंडिया ऑन लाईन गुंतवणूक कंपनीवर पोलीसांनी छापा टाकून १७ जणांना अटक केली असल्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी नवी मुंबई गुन्हे अन्वेषण शाखेच्यावतीने कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत व गुंतवणुकदारांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) गोपनीय सुत्रांकडून मिळालेल्या माहितीवरुन दि.१९/८/२०१७ रोजीचे १७.०० वाजता कळंबोली पोलीस ठाण्याचे हद्दीमधील हॉटेल देवांशी ईन, प्लॉट नं.एल/२, रोड नं.५, ट्रक टर्मिनल, कळंबोली, नवी मुंबई येथे सदरची कारवाई करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी कळंबोली पो.स्टे. येथे गु. र. नं.१५१/२०१७ भादंवि सं.कलम ४२०, ४०६, ३४ सह दि प्राईझ चीटस् ॲण्ड मनी सक्युलेशन स्किम (बॅनिंग) ॲक्ट १९७८ चे कलम ३, ४, ५ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(ड) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी घटनास्थळावरुन एकूण १७ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून मोबाईल लॅपटॉप व इतर मालमत्ता जप्त केल्या असून बॅंक खाती गोठविण्यात आली आहेत.

(४) तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाहतूक कोंडीतून लवकर बाहेर पडण्यासाठी रूग्णवाहिकेस व्ही.आय.पी.दर्जा देण्याबाबत**

**(११) ९५१०२ (०१-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलीसांनी रूग्णास वेळेवर उपचार मिळाल्यास त्याचे प्राण वाचविण्याचे दृष्टिकोनातून वाहतूक कोंडीतून लवकर बाहेर पडण्यासाठी रूग्णवाहिकेस व्ही.आय.पी.दर्जा व रूग्णवाहीकेस प्राधान्य द्या ही मोहीम सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,रूग्णास ठाण्यात योग्य उपचार न मिळाल्यास मुंबईतील रूग्णालयात त्वरीत दाखल करण्यास जाताना रूग्णवाहिकेला टोल नाक्यावर वाहतूक कोंडीस समोरे जावे लागते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रूग्णास वेळेत उपचार मिळून त्याचे प्राण वाचण्यासाठी रूग्णवाहीकेस टोल नाक्यावर वा अन्य वाहतूक कोंडीतून सत्वर मार्गस्थ होण्यासाठी रूग्णवाहीकेस व्ही.आय.पी.दर्जा व रूग्णवाहीकेस प्राधान्य द्या ही मोहीम राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. अपवादात्मक परिस्थितीत टोल नाक्यावर वाहतुकीच्या रांगा असल्यास रुग्णवाहिकेस वाहतूक कोंडीस सामोरे जावे लागते.

(३) ठाणे शहर वाहतूक शाखेकडून एका अशासकीय संघटनेच्या संकल्पनेतून Save a Life Project Giving Way to Emergency Vehicles Enrolling Maharashtra Police या उद्देशाने ठाणे पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात रुग्णवाहिकेस प्राधान्य देण्यासाठी जनजागृती मोहिम माहे नोव्हेंबर, २०१५ पासून राबविण्यात येत आहे.

त्याद्वारे रुग्णालये, विविध सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यालये व महानगरपालिकेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली आहे. रुग्णवाहिकेस मार्गक्रमण करण्यास प्रथम प्राधान्य देण्याबाबत प्रवासी, मालवाहतूक करणाऱ्या वाहनांस तसेच महानगरपालिकेच्या बसेसला, ३,००० स्टिकर्स लावण्यात आलेली आहेत, तर २०,००० बॅनर्स/पोस्टर्स/ पॅम्पलेट्स शाळा महाविद्यालये, ऑटोरिक्षा, टेम्पो अशा विविध वाहनांवर

जनजागृतीच्या दृष्टीने लावण्यात / वाटण्यात आलेली आहेत. रिक्षा, टेम्पो, ट्रक अशा वाहतूकदार संघटनेच्या प्रतिनिधींच्या बैठका घेण्यात येऊन त्याद्वारेदेखील जनजागृती करण्यात आली आहे.

Traffic Awareness Programmes द्वारे शाळा महाविद्यालये, मॉल इ. ठिकाणी कार्यक्रम घेऊन रुग्णवाहिकेस प्राधान्य देण्याबाबत जनजागृती करण्यात आली आहे. टोल नाक्यावर रुग्णवाहिकेस प्राधान्य देऊन मार्ग मोकळा ठेवण्यासाठी व्यवस्थापनातर्फे प्रतिनिधी नेमण्यात आला आहे. वाहतूक नियंत्रण कक्षाकडे हेल्पलाईनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ब्रेन डेड व्यक्तींचे हदय, यकृत इ. अवयवांची तातडीने वाहतूक करण्यासाठी ग्रीन कॉरिडॉरची वाहतूक सुनिश्चित ठेवण्यासाठी रुग्णवाहिकेस व्ही.आय.पी. दर्जा देऊन वाहतूक शाखेकडून रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी प्राधान्याने वाहतूकीचे नियोजन करण्यात येते तसेच अतिगंभीर रुग्णास रुग्णालयास नेण्याच्या मार्गावरील संपूर्ण वाहतूक नियंत्रीत करुन रुग्णवाहिकेस प्राधान्य दिले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील खाजगी सावकारी प्रकरणात अटकेत असलेल्या आरोपीचे पुढा-यांशी असणारे हितसंबंध

**(१२) ९५३०३ (०३-०१-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील खाजगी सावकारी प्रकरणी सध्या खंड्या धाराशिवकर हा खाजगी सावकार अटकेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाराशिवकर याचे सातारा जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये तथाकथीत पुढा-यांशी संबध असून या तथाकथीत पुढा-यांच्या माध्यमातून गोरगरीब शेतक-यांना खाजगी सावकारी मध्ये फसविण्याचे काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील काही तालुक्यातील तथाकथीत पुढा-यांनी खाजगी सावकार खंड्या धाराशिवकर याच्याकडून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीकरीता पैसे वापरले असल्याचेही खात्रीशीर सांगण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धाराशिवकरचे तथाकथीत पुढा-यांशी असणारे हितसंबध पोलीस यंत्रणेने तपासले आहेत काय, नसल्यास अशाप्रकारे तपास न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, धाराशिवकरचे तथाकथीत पुढा-यांशी असणारे हितसंबंध तातडीने तपासून दोषी आढळणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

खंड्या धाराशिवकर याचेविरूध्द सातारा शहर पो.स्टे.गु.र.नं.५११/२०१७ भा.दं.वि.सं.कलम ३९५, ३२३, ५०६ सह सावकारी अधिनियम २०१४ चे कलम ३९ सह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३ (१) (दोन) ३ (२), ३ (४) अन्वये दाखल आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात खंड्या धाराशिवकरसह फलटण नगरपालिकेच्या एका विद्यमान नगरसेवक व बेकायदा सावकारी धंद्यात त्याला मदत करणारे त्याचे साथीदार यांना अटक करून त्यांचेविरूध्द मा.विशेष सत्र न्यायालय (मोक्का न्यायालय), पुणे येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) खंड्या धाराशिवकर याचे कॉल डिटेल्स काढून त्यानुषंगाने त्याचेशी हितसंबंध असणारे व्यक्ति यांचेकडे बारकाईने तपास करण्यात आलेला आहे. परंतू फलटण नगरपालिकेच्या एका विद्यमान नगरसेवकाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पुढाऱ्याशी खाजगी सावकारीचे माध्यमातून त्याचे संबंध असल्याचे तपासात निष्पन्न झाले नाही.

(६) विलंब झालेला नाही.

---

**"महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ" यांच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांकरीता निधी वितरित करणेबाबत**

**(१३) ९९५९३ (०६-०१-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील "महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ" यांच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा निधी तातडीने कामगार कल्याण मंडळाच्या सभासदांना तातडीने वितरित करणेबाबत लोकप्रतिनिधी पंढरपूर यांनी पत्राद्वारे मा.मंत्री. कामगार यांना विनंती केली असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशी मागणी "महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ" यांच्या मार्फत संघटनेच्या वतीने शासनाकडे वारंवार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कामगार मंडळाच्या मांगणीबाबत अदयापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१५-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, सोलापूर कार्यालयाकडून विविध योजनांतर्गत आतापर्यंत ११५९२ नोंदीत बांधकाम कामगारांना रु.५,६१,७८,०००/- एवढ्या अर्थसहाय्याचा लाभ देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लांखादूर (जि.भंडारा) येथील अल्पवयीन मुलीवर झालेला लैंगिक अत्याचार

**(१४) ९९८२१ (०६-०१-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांखादूर (जि.भंडारा) येथील अल्पवयीन मुलीवर दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास लैंगिक अत्याचार करुन चित्रफीत काढण्याच्या विरोधात लांखादूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार गुन्ह्यातील आरोपींना शिक्षा व पिडितेस निर्भया योजनेचा लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

(३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून लाखांदूर पोलीस स्टेशन येथे अप क्र ४९/२०१७ कलम ३७६(ड),३६३,५०६(ब) भादंवि सह कलम ४,६ बाल लैंगिक अत्याचार अधिनियम सन २०१२,सह कलम ४३,६७(ब) माहीती तंत्रज्ञान अधिनियम सन २००० अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्यात ५ आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.सदर गुन्ह्यात दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच, महिला व बालविकास अधिकारी भंडारा यांचे मार्फत दिनांक २०/३/२०१७ रोजी पिडीतेस रू.३,००,००० इतकी आर्थिक मदत मंजूर झालेली आहे. त्यापैकी रू १,५०,०००/- अदा केलेले असून उर्वरीत रू. १,५०,००० इतकी रक्कम पिडीतेस अदा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद येथे एटीएम केंद्रावर एटीएम कार्डची अदलाबदल करुन नागरीकांची फसवणूक करणाऱ्या टोळीला अटक केल्याबाबत

**(१५) १००५३८ (०६-०१-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे एटीएम केंद्रावर पैसे काढण्यासाठी गेलेल्या नागरीकांना मदतीच्या बहाण्याने एटीएम कार्डची अदलाबदल करुन फसवणूक करणाऱ्या एका आंतरराज्यीय टोळीला ग्रामिण पोलीसांनी अटक केलेली असून या टोळीवर २ वर्षात ११ राज्यामध्ये १०० गुन्हे दाखल आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१८)** : (१) व (२) औरंगाबाद येथे एटीएम सेंटरवर पैसे काढण्यासाठी गेलेल्या नागरीकांना मदतीच्या बहाण्याने एटीएम कार्डची अदलाबदल करुन फसवणूक करणाऱ्या एका आंतरराज्यीय टोळीला ग्रामिण पोलीसांनी अटक केलेली आहे. सदर प्रकरणी वैजापूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४७३/२०१७ भा. दं. वि. कलम ४२० सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ड) प्रमाणे दि.११/०९/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आले असुन आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. तपासात आरोपींनी इतर राज्यात गुन्हे केल्याचे माहिती मिळाली. परंतु सदर आरोपींनी २ वर्षात ११ राज्यात १०० गुन्हे केले असल्याची बाब अद्याप निष्पन्न झाली नसून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

याव्यतिरिक्त दौलताबाद पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.८२/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४२० प्रमाणे गुन्हा दाखल असुन गुन्ह्याचा तपास चालु आहे. तसेच, वाळूज पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५२/२०१७ भा. दं. वि. कलम ४२० सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ड) प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## आणीबाणीच्या काळात तुरुंगात गेलेल्या व्यक्तींना केद्र शासनाने जाहीर केलेल्या निवृती वेतन योजनेच्या लाभाबाबत

**(१६) १०४८६१ (०५-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने जाहीर केलेल्या निवृती वेतन योजनेचा लाभ घेतांना नाशिक कारागृह येथे रेकार्ड उपलब्ध नसल्यामुळे सन १९७५ साली जाहीर केलेल्या आणीबाणीच्या काळात तुरुंगात गेलेल्या व्यक्तींना निवृती वेतन प्राप्त करण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारागृह व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे आणीबाणीच्या काळात तुरुंगात गेलेल्या व्यक्तींना होत असणारा त्रास दूर करून निवृत्ती वेतन मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर उपाययोजनेचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१८)** : (१), (२) व (३) कारागृह व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे आणीबाणीच्या काळात तुरुंगात गेलेल्या व्यक्तींना त्रास होत असल्याबाबत कोणतीही तक्रार / निवेदन प्राप्त झालेले नाही. शासनाने आणिबाणीच्या काळात ज्या व्यक्तींना तुरुंगवास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्याबाबत धोरण ठरविण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.निवृवे-१०१५/प्र.क्र.२६१/२०१५(२०१८)/ स्वासैक-१, दि.१४.०२.२०१८ नुसार मंत्रीमंडळ उपसमिती नेमलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव तालुक्यातील (जि.नाशिक) श्री. फारुख खान यांना धमकी दिल्याबाबत**

**(१७) १०५६१८ (१२-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव तालुक्यातील (जि.नाशिक) श्री.गजानन राजमाने डी.वाय.एस.पी मालेगांव यांचे स्पेशल स्कॉडचे दोन पोलीस कर्मचारी यांनी श्री. फारुख खान, फैजुलउलाह खान, (रा.मालेगांव) यांना दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास एका शेतात नेऊन महानगरपालिकेची निवडणूक लढवू नकोस अशी धमकी दिल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.फारुख खान हे नगरसेवक असून त्यांच्याकडे किरकोळ बिफ विकण्याचा परवाना आहे थोड्या दिवसापुर्वीच श्री.फारुख खान व त्यांच्या भावावर खोटी केस दाखल केली तसेच आता त्यांच्या कुंटूंबियांवर खोट्या केसेस दाखल करण्याचे षडयंत्र सुरु असल्याने त्यांच्या कुंटूंबियामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
सदर प्रकरणी नाशिक जिल्हयात कोठेही तक्रार अथवा गुन्हा दाखल नाही.
(२) व (३) श्री.फारुक खान फैजुलउलाह खान यांच्या नावावर कोणत्याही बीफ विक्री करण्याचा परवाना नाही. ते स्वत: गोवंश जनावरांचा कमिशन वर व्यापार करुन शिरपुर, जिल्हा धुळे येथुन मालेगाव शहरात कत्तलीकरिता आणत असताना त्यांच्यावर गोवंश कायद्यान्वये तसेच इतर कायद्यान्वये सन २०१२ ते २०१७ पर्यत ७ गुन्हे दाखल आहेत.
(४) विलंब झाला नाही.

---

**पुणे आणि पिंपरी शहरात वाहन चोरीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(१८) १०५८९१ (१४-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे आणि पिंपरी शहरात वाहन चोरीचे प्रमाण वाढले असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे सप्टेंबर, २०१६ अखेर पुणे पिंपरी चिंचवड शहरात २२१६ वाहने चोरीस जाऊन त्यापैकी केवळ सुमारे ३०० गुन्हे उघडकीस आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार सदरहू चोरींचे प्रमाण कमी करण्यासंदर्भात प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१८) :** (१) पुणे शहर आयुक्त कार्यक्षेत्रात सन २०१५ मध्ये वाहन चोरीचे २६७९ गुन्हे दाखल असून त्यापैकी ७३० गुन्हे उघडकीस आले आहेत.

सन २०१६ मध्ये ३०७६ गुन्हे दाखल असून त्यापैकी १००८ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सन २०१७ मध्ये ३१६५ गुन्हे दाखल असून त्यापैकी ९७७ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सन २०१८ मध्ये १५ फेब्रुवारी अखेर ४५० गुन्हे दाखल असून त्यापैकी ७६ गुन्हे उघडकीस आले आहेत.
(२) पुणे शहर आयुक्त कार्यक्षेत्रात माहे जानेवारी २०१६ ते माहे सप्टेंबर २०१६ अखेर वाहन चोरीचे २२५७ गुन्हे दाखल असून, त्यातील ६७३ गुन्हे उघडकीस आले आहेत.
(३) वाहन चोरी संबंधात दाखल होणा-या गुन्ह्यांचा तात्काळ तपास करण्यात येतो. तसेच वाहन चोरीस आळा घालण्यासाठी पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील सर्व विभागीय सहा. पोलीस आयुक्त यांचे अधिपत्याखाली वाहन चोरी गुन्हे अन्वेषण व वाहन चोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध बसावा याकरीता विशेष पथक निर्माण करण्यात आले आहे. त्याप्रमाणे स्वतंत्र पथक कार्यरत असून, त्या पथकाकडून वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा तपास करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### काशिमिरा (जि.ठाणे) येथील महिलेवर टॅक्सी चालकांनी वज्रेश्वरी येथे नेऊन त्याच्या साथीदारासह लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(१९) १०६०६८ (०७-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमर काळे (आर्वी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काशिमिरा (जि.ठाणे) येथील महिला ओला टॅक्सी समजून ती चुकून टॅक्सीत बसली असता टॅक्सी चालकांनी वज्रेश्वरी येथे नेऊन टॅक्सी चालकाने व त्याच्या साथीदाराने दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लैंगिक अत्याचार केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

सदरचा गुन्हा दिनांक १९/१२/२०१७ रोजी घडलेला आहे.

(२) होय,

फिर्यादीने झालेल्या घटनेबाबत काशिमीरा पो.ठाणे येथे दिनांक २०/१२/२०१७ रोजी तक्रार केली असता तेथे गु र नं ६५४/२०१७ भादंवि सह कलम ३७६,३९२,३६३,३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्यात २ आरोपीना अटक करण्यात आलेली असून ते न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपींविरूध्द दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.सद्यस्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरातील गिरगांव चौपाटीवरील बिर्ला क्रिडा केंद्राच्या जमीनीवर जेट्टी उभारण्याचा प्रस्ताव**

**(२०) १०६०८६ (२६-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील गिरगांव चौपाटीवर पर्यटनाला चालना देण्यासाठी बिर्ला क्रिडा केंद्राची काही जमीन घेऊन त्या ठिकाणी जेट्टी उभारण्याचा प्रस्ताव गत १ वर्षापासून शासनाच्या विचाराधीन असून त्यावर निर्णय झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,पर्यटनाला चालना देण्यासाठी जेट्टीच्या उभारणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१८) :** (१) व (२)

सदर जेट्टी उभारणीच्या दृष्टीने मुंबई पोर्ट ट्रस्ट प्रशासनाने पर्यावरण व जलवायू परिवर्तन विभाग यांच्याकडून लागणा-या सर्व परवानग्या प्राप्त करण्यासाठी सल्लागार नेमण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीबी (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) पोलीस स्टेशन अंतर्गत येणा-या मलकापूर पांग्रा व झोटींगा येथे सराफा दुकानासह दोन घरांवर पडलेला दरोडा**

**(२१) १०६६४० (१२-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीबी (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) पोलीस स्टेशन अंतर्गत येणा-या मलकापूर पांग्रा व झोटींगा येथे दिनांक १६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सराफा दुकानासह दोन घरांवर दरोडा पडला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चोरीत किती ऐवज लुटण्यात आला आहे व या प्रकरणात अद्यापपर्यंत किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) पो.स्टे. साखरखेर्डा अंतर्गत ग्राम मलकापूर पांग्रा येथील फिर्यादी नितीन जगदीशराव रत्नपारखी, रा.बिबी यांचे मलकापूर पांग्रा मार्केट लाईन मधील रत्नपारखी फॅन्सी ज्वेलर्सचे दरवाज्याचे अज्ञात चोरट्यांनी कुलूप कापून दुकानात प्रवेश करुन सोन्याचांदीचे दागीने असा एकूण २,४५,९००/- रु. चा माल चोरुन नेल्यावरुन फिर्यादी नितीन रत्नपारखी यांचे रिपोर्टवरुन अपराध क्र.२१९/१७ कलम ४६१, ३८० भादंवी दाखल आहे.

पो.स्टे. साखरखेर्डा अंतर्गत ग्राम मलकापूर पांग्रा येथील फिर्यादी अलताफखां पठाण यांच्या मलकापूर पांग्रा मार्केट लाईन मधील राहते घरात अज्ञात चोरट्यांनी घराचे दरवाज्याचे कुलूप कापून घरात प्रवेश केला व लोखंडी कपाटात लॉकर्स मध्ये ठेवलेले नगदी ३,०००/- रु. व एक हजार रुपयाचे कपडे असा एकूण ४,०००/- रु. चा माल अज्ञात इसमांनी चोरुन नेला अशा रिपोर्टवरुन अपराध क्र.२९२/१७ कलम ४५७, ३८० भादंवीचा दाखल आहे.

पो. स्टे. बिबी अंतर्गत ग्राम झोटींगा येथे १६ डिसेंबर २०१७ चे रात्री २३.०० वा.गजानन रावजी मूसदवाले यांचे घरातून सोन्या चांदीचे दागिन्याचा एकूण १,४३,०००/- रु.चा माल चोरी गेलेला आहे. व साक्षीदार नामे श्रीमती रंजनाबाई प्रल्हाद डिघोळे रा.झोटींगा यांचे घरातून सुध्दा सोन्या चांदीचे दागीने व नगदी असा एकूण ५,५२,०००/- रु. असा एकूण दोन्ही घरातून ९,९५,०००/- रु. चा माल अज्ञात आरोपीने चोरुन नेल्याप्रकरणी गजानन रावजी मूसदवाले यांचे रिपोर्टवरुन दि.१७/१२/२०१७ रोजी पो.स्टे. बिबी येथे अप नं.२१०/१७ कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्यांचा तपास सुरु असून अद्यापपावेतो आरोपी निष्पन्न झालेले नसल्याने आरोपी अटक नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य इमारत बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या नोंदीत लाभार्थ्यांना अवजारे अनुदानाकरिता दिलेली मुदत शिथिल करण्याबाबत

**(२२) १०६६६० (१४-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य इमारत बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या नोंदीत लाभार्थ्यांना अवजारे अनुदानाकरिता माहे मार्च २०१७ ची मुदत शिथिल करून ती डिसेंबर, २०१७ करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपूर (जि.अमरावती) यांनी शासनाच्या कामगार विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी मागणी करताना दिलेली कारणे खरी आहेत काय,
(३) असल्यास, उक्त मुदत माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दि.१.३.२०१७ अन्वये मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांच्या प्रती कुटुंबास बांधकामासाठी उपयुक्त/आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरिता रु.५,०००/- चे अर्थसहाय्य हे बांधकाम कामगारांच्या नोंदणीनंतर लगेच देण्यात येते, सदर अनुदान तीन वर्षासाठी आहे. तीन वर्षानंतर लाभ घेण्यासाठी अशा बांधकाम कामगारांची मंडळाकडे सलग तीन वर्षे नोंदणी असणे अनिवार्य आहे. त्यामुळे मुदत शिथील करण्याची बाब उद्भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वडुज (ता.खटाव, जि.सातारा) येथील चार व्यक्तींनी एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(२३) १०६८०५ (११-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडुज (ता.खटाव, जि.सातारा) येथील चार व्यक्तींनी एका अल्पवयीन शाळकरी मुलीवर सलग दोन दिवस सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याची घटना दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आरोपींना पोलीसांनी अटक करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
सदर घटना दिनांक ३१.१२.२०१७ व दिनांक १.१.२०१८ रोजीची आहे.
(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून वडुज पोलीस ठाणे येथे गुरनं ०९/२०१८ भादंविस कलम ३७६(ड), ४५२, ५०६ बा.लै.अत्या.सं अधिनियम २०१२ चे कलम ४ व ६ अन्वये दाखल करून एका आरोपी व तीन विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर गुन्ह्यातील

एका आरोपी विरूध्द जिल्हा व सत्रन्यायालय वडुज व ३ विधीसंघर्षीत बालका विरूध्द बालन्यायमंडळ सातारा येथे दोषारोपपत्र दाखल केले आहे. सद्यस्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**तासगांवहून (जि.सांगली) विट्याकडे येणाऱ्या एस.टी बस मधून रुपये १ लाख ८९ हजाराची झालेली चोरी**

**(२४) १०७३२४ (०६-०४-२०१८). श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव (जि.सांगली) येथे तासगावहून विट्याकडे येणाऱ्या एस.टी बसमधून अज्ञात व्यक्तींनी १ लाख ८९ हजाराची चोरी केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार एस.टी बसमधून झालेल्या चोरीचा ऐवज हस्तगत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) सदरबाबत विटा पोलीस ठाणेत गुरनं ४६८/२०१७ भा.दं.वि.स. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हाचा तपास सूरु आहे.

तपासात तासगाव एस. टी. स्टँड अथवा तासगांव-विटा प्रवासादरम्यान अनोळखी महिलांनी वा अज्ञात चोरट्याने सदरचा गुन्हा केल्याचे तपासात दिसुन येत आहे. सदरबाबत जिल्ह्यात व परजिल्ह्यात तपास याद्या रवाना केल्या आहेत. अशा प्रकारचे गुन्हे करणारे आरोपी महिलांची माहिती घेवुन, त्यांचेकडे कसुन तपास करुन त्यांचे राहते घराची घरझडती घेतल्या आहेत. सराईत गुन्हेगारांवर अहोरात्र नजर ठेवून घटने दिवशीच्या हालचालीची खात्री केली आहे. सराफ असोशिएशन विटा व तासगाव यांना नोटीस बजावली आहे. तासगाव पोलीस ठाणे येथील अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या रेकॉर्डवरील ३ महिलांच्या घराची घरझडती घेतली आहे. साक्षीदारांकडे तसेच बस स्टँड, बाजार, सराफ पेठ इत्यादी ठिकाणी साध्या गणवेशात पेट्रोलींग करुन, चोरटे व संशयित महिलांचा तपास केला आहे. गुप्त बातमीदारांमार्फत तपास केला असून, अद्याप तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील बांधकाम क्षेत्रासह इतर सर्व क्षेत्रातील असंघटीत कामगारांना हक्काचे घर देण्याच्या निर्णयाबाबत**

**(२५) १०७३७७ (१४-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बांधकाम क्षेत्रासह इतर सर्व क्षेत्रातील असंघटीत कामगारांना हक्काचे घर देण्याचा निर्णय शासन घेत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेखाली लवकरच ५० हजार घरे बांधली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेसाठी शासनाने निधीची तरतूद करुन पुढील प्रक्रिया सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ३.२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत केवळ बांधकाम क्षेत्रातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत कामगारांना घरे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) खरे आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सन २०२२ पर्यंत १९.४० लक्ष घरकुलांच्या बांधणीचे उद्दीष्ट आहे. त्या अंतर्गत बांधकाम कामगारांसाठी योजनेनुसार प्रती वर्षी ५०,००० घरकुले याप्रमाणे सन २०२२ पर्यंत एकुण २,५०,००० घरकुले उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(३) या योजनेंतर्गत पात्र ठरणाऱ्या नोंदीत बांधकाम कामगारांना केंद्र शासनाकडून रु.१.५० लक्ष, राज्य शासनाकडून रु.१.०० लक्ष व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून रु. २.०० लक्ष अनुदान देण्यात येणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या हिश्याचे अनुदान प्राप्त करुन वितरणाबाबतची कार्यवाही करण्यासाठी गृहनिर्माण विभाग समन्वय संस्था (नोडल एजन्सी) म्हणून काम करणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___

## पुणे शहरात ऑनलाईन पद्धतीने मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत असल्याबाबत

**(२६) १०९०२६ (१८-०४-२०१८). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील नागरिकांना फोन करून आधार क्रमांक विचारणे एटीम कार्डच्या नंबरची विचारणा करून लोकांना आर्थिक व्यवहाराबाबत विचारणा करून त्या व्यक्तीकडून नकळतपणे त्याच्या वैयक्तिक खात्या संदर्भात पटकन माहिती घेणे आणि ऑनलाईन पद्धतीने त्याच्या खात्यातील रक्कम चोरणे या बाबतच्या गुन्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सरकारकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१८) :** (१) पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात अशा प्रकारचे सन २०१६ मध्ये २९ गुन्हे घडले असून, सन २०१७ मध्ये ३९ गुन्हे घडले आहेत.

(२) याबाबत गुन्ह्यांना आळा बसावा म्हणून पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात आली आहे.

१. सायबर क्राईम सेल, पुणे शहर कार्यालयाकडून माहे जानेवारी २०१७ ते डिसेंबर २०१७ या वर्षभरात एकुण ४९ शाळा, कॉलेज व इन्स्टीट्यूट मध्ये सायबर अवेरनेस प्रोग्राम घेवून एकूण ७००५ विद्यार्थी, अधिकारी व सामान्य जनतेस मार्गदर्शन करण्यात आले आहे.

२. We Fight Cyber Crime या उपक्रमाखाली लोकांमध्ये सायबर क्राईमबाबत जनजागृती निर्माण करुन लोकांनी सायबर क्राईमला बळी पडू नये यासाठी मार्गदर्शन केले.

३. शहरातील सिनेमागृहे व मॉल्समध्ये सायबर क्राईम अवेरनेस करणेसाठी चित्रफीत प्रक्षेपित करण्यात आली आहे.

४. सर्व बँकांचे व मोबाईल कंपनीचे नोडल ऑफीसर यांच्या नियमित मिटींग घेवून सायबर क्राईमबाबत काय उपाययोजना करता येतील याची चर्चा करण्यात आली.

५. वर्तमानपत्रामध्ये सायबर क्राईम सेलकडील वेगवेगळ्या गुन्ह्यामध्ये तपास करुन अटक केलेल्या आरोपीबाबत प्रेस नोट सादर करुन सामान्य जनतेस माहीत देण्यात आलेली आहे.

६. विविध एक्स्पो मध्ये जनतेत सायबर क्राईमबाबत जनजागृती निर्माण करणेसाठी स्वतंत्र स्टॉल लावून मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील डॉ चैतन्य कॉर्ड लाईफ बायोटेक कंपनी टाळे ठोकून बंद असल्याबाबत

**(२७) १०९१०३ (१२-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे),**

**प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील जन्मलेल्या बाळाच्या नाळेतील रक्त साठवणारी डॉ चैतन्य कॉर्ड लाईफ बायोटेक कंपनी टाळे ठोकून बंद झाल्याने एका (फिर्यादी स्मिता जितुरी, रा.मुकुंदनगर, स्वारगेट) महिलेने कोथरुड पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल केला असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी डॉ चैतन्य कॉर्ड लाईफ बायोटेक या कंपनीतील तीन महिला व एका पुरुषाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी फसवणूक करणा-या गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन कोथरुड पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. ४८९/२०१७, भादंवि क्र.४०६, ४२०, ३४ प्रमाणे दि.३०/१२/२०१७ रोजी तीन व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेडचे जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्या कुटुंबाला सामाजिक बहिष्कृत केल्याबाबत

**(२८) ११०१७६ (०७-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेडचे जिल्हा क्रिडा अधिकारी श्री.गंगालाल किशनलाल कुटलिया (यादव) व त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांना सामाजिक बहिष्कृत केल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत यादव बंधूंनी इतवारा पोलीसांकडे दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी तकार करूनही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) हे, खरे आहे.
(२) व (३) सदर घटनेबाबत दिनांक ३०/०१/२०१८ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

फिर्यादीने दिलेल्या तक्रार अर्ज प्रकरणात प्राथमिक चौकशीअंती इतवारा पोलीस स्टेशन नांदेड येथे गु रं नं ३३/२०१८ कलम ३(१)(२) (४)(८),४/५,७ महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तीचे संरक्षण अधिनियम २०१६ अन्वये ११ आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील एकूण ११ आरोपींना अटक करण्यात येऊन न्यायालयात हजर करण्यात आले आहे. आरोपीतांविरूध्द दि. ०५/०२/२०१८ रोजी इतवारा पोलीस स्टेशन येथे चॅप्टर केस क्र. २०/१८ कलम १०७ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात पोलीस तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे येथील मुंब्रा-कौसा परिसरात पाण्याची तीव्र समस्या असल्याबाबत**

**(२९) ११०७२८ (१९-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मुंब्रा-कौसा परिसरातील पाण्याची समस्या तीव्र बनलेली असून पाण्याची समस्या सोडविण्याच्या मागणीसाठी येथील नागरिकांनी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून आंदोलन केलेले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी कपाती नंतर पाणी पुरवठा सुरु केला असता जलवाहिनी फुटल्याने पुन: पाणी पुरवठा खंडीत झाला. परंतु, जलवाहिनी दुरुस्त करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला, असे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुकूंदवाडी (जि.औरंगाबाद) रेल्वे स्टेशन परिसरात तरुणास बांधून रेल्वे पटरीवर फेकून दिल्याबाबत**

**(३०) ११०७६२ (१४-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील मुकूंदवाडी रेल्वे स्टेशन परिसरात रुपये २ लाखांच्या देवाणघेवाणीवरुन श्री.रविंद्र नाना दांडगे या तरुणाला विष पाजून त्याचे हातपाय बांधून रेल्वे पटरीवर फेकून दिले असल्याचे दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात जीवे मारण्याचा गुन्हा येथील पुंडलिक नगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने तपास करुन या घटनेतील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१८) :** (१) व (२) दि.१५/११/२०१७ रोजी आरोपीने फिर्यादीस मुकूंदवाडी रेल्वे स्टेशन येथे बोलावून पैशांबाबत विचारणा केली असता फिर्यादीने जानेवारी मध्ये देण्याचे सांगितल्यानंतर आरोपीने फिर्यादीस हात बांधून बळजबरीने काहीतरी विषारी औषध पाजून रेल्वे पटरीवर फेकून दिल्याबाबत दि.१६/११/२०१७ रोजी पुंडलीकनगर पोलीस ठाण्यामध्ये गु.र.क्र.४७/२०१७ भा.दं.वि.स. कलम ३०७, ३२८, ३२३, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) तपासात फिर्यादीने आरोपीच्या घटनेवेळीच्या उल्लेख केलेले मोबाईलचे लोकेशन केदारखेडा, ता. भोकरदन, जि.जालना येथे निष्पन्न झाले आहे. आरोपीच्या वडीलांनी फिर्यादीने आपल्या मुलास पैसे घेवून नोकरी लावण्याचे अमिष दाखवून फसवणूक केल्याचा व पैसे परत मागितल्याने खोटा गुन्हा दाखल केल्याचा जबाब दिला आहे. घटनेवेळीचे फिर्यादीचे अंगावरील कपडे व फिर्यादिच्या Gastric Lavage Sample मध्ये कोणत्याही प्रकारचे विष नसल्याचा अहवाल प्रयोगशाळेतून प्राप्त झाला आहे. सखोल तपास करून गुन्ह्याची सत्यता पडताळून आरोपीविरूध्द सबळ पुरावे मिळताच आरोपीस अटक करून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

___

**म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्माण होणेबाबत**

**(३१) ११०७९५ (०७-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर विधानसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागाचा समावेश होत असून म्हारळ, वरप, कांबा व आजूबाजूची गावपाडे, वाड्या या सर्व मिळून लोकसंख्या जवळपास ८० ते ९० हजार असून सदरची गाव, पाडे टिटवाळा पोलीस स्टेशन अंतर्गत येतात, सदरचे पोलीस स्टेशन या परिसरापासून १० कि.मी. अंतरावर आहे, झपाट्याने होत असलेल्या लोकसंख्या वाढीमुळे सदर परिसरात चोऱ्या, मारामारी, खून अशा प्रकारच्या गुन्हेगारी घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने म्हारळ, (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे स्वतंत्र पोलीस

स्टेशनची मागणी परिसरातील नागरिकांनी व लोकप्रतीनिधिंनी बऱ्याच कालावधीपासून शासनास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने म्हारळ येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) म्हारळ, (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे. सन २०११ च्या जनगणेनुसार म्हारळ गावची लोकसंख्या ३१,६२५, वरप गावची लोकसंख्या ३,५०० व कांबा गावची लोकसंख्या ५,४३० अशी आहे. सदरहू गावे ही कल्याण ता. (टिटवाळा) पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रामध्ये येत असून ती लोकल रेल्वे व रस्ते मार्गाने संबंधीत पोलीस ठाण्याशी जोडलेली आहेत. म्हारळ, वरप, कांबा या भागामध्ये सन २०१६ मध्ये चोरी, मारामारी व खून यांचे अनुक्रमे १३, २३, व ०४ गुन्हे दाखल झाले असून सन २०१७ मध्ये चोरी, मारामारी व खून यांचे अनुक्रमे १४, २६, व ०४ गुन्हे दाखल झाले आहेत. सदर भागातील नागरिकांच्या तक्रारी त्वरीत दाखल करुन घेण्यासाठी म्हारळ येथे पोलीस चौकी स्थापन करण्यात आली असून सदर पोलीस चौकीमध्ये ०१ अधिकारी व १० पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरहू पोलीस अधिकारी/कर्मचारी हे नागरिकांच्या तक्रारीचे तात्काळ निवारण करीत असतात.

(२) म्हारळ, वरप व कांबा या परिसरासाठी एक स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांच्याकडून मागविला आहे. तथापि सदरहू प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ३६ माथाडी मंडळे बरखास्त करुन एकच माथाडी मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(३२) १११२६६ (१२-०४-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६ माथाडी मंडळे बरखास्त करुन एकच माथाडी मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून या प्रस्तावाचा अभ्यास करुन अहवाल देण्यासाठी कामगार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ४ जणांची समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीने यासंदर्भातील अहवाल शासनास सादर केला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच एकच माथाडी मंडळ स्थापन झाल्यास माथाडी कायद्याचे अस्तित्व संपुष्टात येणार असल्याने राज्यभर हमाल पंचायतींकडून विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास याबाबत रत्नागिरी - सिंधुदुर्ग हमाल पंचायतीच्या वतीने दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लाक्षणिक संप पुकारला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाची भुमीका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०७-२०१८) :** (१), (२), (३), (४), व (५) महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अन्वये निर्माण करण्यात आलेल्या राज्यातील सर्व माथाडी मंडळामध्ये सुसूत्रता ठेवण्यासाठी व अधिनियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावर एकच माथाडी मंडळ गठीत करण्यासाठी अभ्यास गटाची नियुक्ती शासन निर्णय दि.१७/१/२०१८ अन्वये करण्यात आली. तसेच दि.१४/०३/२०१८ अन्वये सदर अभ्यासगटामध्ये माथाडी कामगारांच्या मान्यताप्राप्त संघटनांचे प्रतिनिधी म्हणून मा.विधानसभा सदस्य, मा.विधान परिषद सदस्य यांचा समावेश करण्यात आला होता.

तथापि, राज्यातील विविध माथाडी कामगार संघटनांनी दि.३०/१/२०१८ रोजी पुकारलेला संप व त्यानंतरच्या कालावधीत शासनाकडे दाखल केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने समिती गठीत करण्याबाबतचे दि.१७/१/२०१८ व दि.१४/३/२०१८ रोजीचे शासन निर्णय हे दि.२७/३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मागे घेण्यात आले आहेत. माथाडी अधिनियम १९६९ च्या कलम २३ व महाराष्ट्र सुरक्षा रक्षक अधिनियम १९८१ मधील २४ अन्वये विकास आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशी समितीच्या अहवालानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या कर्मचा-यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत

**(३३) १११६१७ (१२-०४-२०१८). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या कर्मचा-यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत मा.कामगार मंत्री यांच्यासमवेत दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधी आणि महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक व जनरल कामगार संघटनांचे प्रमुख पदाधिकारी, कामगार आयुक्त यांची बैठक झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची अद्यापही शासनाकडून अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत केलेल्या कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
मा.कामगार मंत्री यांच्यासमवेत दि.०२/०८/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा स्तरावर अंमलबजावणी चालू आहे.
(३) i) महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ ची मंडळामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असून ज्या आस्थापनांनी मंडळामार्फत बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यामधील नोंदीत सुरक्षा रक्षकांऐवजी खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीच्या सुरक्षा रक्षक तैनात केल्याचे निदर्शनास आले आहे, अशा बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या निरिक्षकांमार्फत निरिक्षण शेरे पारित करण्यात येऊन सदर आस्थपनांविरुध्द एकूण २१६ खटले मा.प्रथम न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल केले असून सदर खटले न्यायप्रविष्ठ आहेत.

ii) मंडळातील राजीनामा दिलेल्या / सेवानिवृत्त झालेल्या व निधन झालेल्या सुरक्षा रक्षकांची कायदेशीर देय रक्कम अदा करताना भविष्य निर्वाह निधीची परिगणना व्यवस्थित न केली गेल्यामुळे व भविष्य निर्वाह निधीच्या जमा रक्कमेवर चुकीच्या पध्दतीने व्याजाची आकारणी झाल्यामुळे सुरक्षा रक्षकांना अनुज्ञेय रक्कमेपेक्षा जादा रक्कम अदा करण्यात आली होती. त्यामुळे सदर प्रकरणी मंडळामार्फत संबंधित अधिका-यांची विभागीय चौकशी चालू असून चौकशी अधिका-यांच्या अहवालानंतर सदर अधिका-यांविरुध्द उचित कारवाई करण्यात येणार आहे.

सुरक्षा रक्षकांना जी अतिरिक्त रक्कम अदा करण्यात आली आहे त्या रकमेच्या वसुलीची कार्यवाही मंडळामार्फत चालू असून एकूण ५१ सुरक्षा रक्षकांकडून रु.१,१८,२९१.७५ इतक्या रकमेची वसुली झालेली असून सदर रक्कम मंडळामध्ये भरणा करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित रक्कमेच्या वसुलीची बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा सुरक्षारक्षक मंडळामार्फत योग्य ती कार्यवाही चालू आहे.
बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा सुरक्षारक्षक मंडळाने संगणक देखभाल व सपोर्ट याबाबतच्या कामाकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागांकडून दोन तांत्रिक सपोर्टची मागणी केलेली आहे. तसेच पुर्णत: मंडळाने संगणक प्रणाली (Software & Hardware) अद्ययावत करण्याकरीता तांत्रिक सल्लागाराची (Technical Consultant) ची नियुक्ती केलेली आहे.

मंडळाने सुरक्षा रक्षकांच्या वेतनामधून कपात करण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम बँकेत गुंतवणूकीसंदर्भात तसेच सुरक्षा रक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीच्या जमा रक्कमेसंदर्भात स्वतंत्रपणे ऑडिट करणेबाबत शासनामार्फत लेखापरिक्षकांच्या नियुक्त केलेल्या पॅनलमधून अर्ज मागविण्यात आलेले आहेत व याबाबत मंडळ स्तरावर कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघाडी (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील रामेश्वर भगवान वारकरी शिक्षण संस्थेतील महाराज यांच्यावर बालकावर लैगिंक अत्याचार केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केल्याबाबत**

**(३४) १११७४२ (११-०४-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघाडी (ता.पैठण, जिऔरंगाबाद) येथील रामेश्वर भगवान वारकरी शिक्षण संस्थेतील महाराज गणेश लक्ष्मण तौर यांच्यावर माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान बालकावर लैगिंक अत्याचार केल्याप्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने दोषी आढळणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

सदरची घटना दिनांक १७.१२.२०१७ रोजी घडलेली आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पैठण पोलीस ठाणे येथे गुरनं ४५८/२०१७ कलम ७,८,९ (फ),९ (ड) पोक्सो २०१२ अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आलेली असून त्याचे विरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी चिंचवड शहर (जि.पुणे) येथे स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापनेबाबत**

**(३५) १११९४० (०७-०४-२०१८). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवडसह (जि.पुणे) आसपासच्या गावातील वाढती लोकसंख्या तसेच खून, दरोडे, मारामाऱ्या इत्यादी गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याने पिंपरी चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय होणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीनीही या प्रकरणी सतत शासनाकडे पाठपुरावा करीत असून स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पुणे पोलीसांनी गृह विभागाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवडला स्वतंत्र पोलीस आयुक्तालयासाठी मान्यता देण्याबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरूप काय आहे व तद्नुसार स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) पिंपरी चिंचवड व परिसराकरीता स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतच्या प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून तद्नुषंगाने दिनांक २८.०५.२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर येथील सबजेल चौकातील सरस्वती नाईट स्कूलचा मुख्याधापकाने विदयार्थिनीवर अत्याचार केल्याबाबत**

**(३६) ११२१४२ (१४-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील सबजेल चौकातील सरस्वती नाईट स्कूलचा मुख्याधापक याने एका विद्यार्थिनीवर लग्न करण्याचे आमिष दाखवून तीन वर्षापासून अत्याचार केल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी मुख्याधापकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

सदरची घटना सन २०१५ ते दिनांक १९/१/२०१८ पर्यंतची आहे.

(२) फिर्यादिने दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पो.स्टेशन येथे गुरनं ३५/२०१८ भा दं वि क ३७६(२), (एफ) (एन),३२३,५०४,५०६,५०७ सह अ.जा.ज.प्र कायदा कलम ३(१)(डब्ल्यु) ३(२)(व्हि-ए) अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे आरोपी यास सरस्वती मंदिर नाईट स्कुल अहमदनगर यांनी दिनांक २४/१/२०१८ पासून सेवेतून निलंबित केलेले आहे. आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जून्नर (जि.पुणे) येथील येनेरे इंडियन इंग्लिश मीडियम स्कूलमधील विदयार्थिनींसोबत शिक्षक व संस्थाचालकांनी घृणास्पद कृत्ये केल्याबाबत**

**(३७) ११२१७० (०६-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जून्नर (जि.पुणे) येथील येनेरे इंडियन इंग्लिश मीडियम स्कूलमधील विदयार्थिनींना बाथरुममध्ये बोलावून शिक्षक व संस्थाचालकांनी घृणास्पद कृत्ये केल्याची बाब दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेच्या संस्थापक संचालकांनी एका १३ वर्षीय विघार्थीनीला स्नानगृहामध्ये पाणी येत नसल्याचे कारण देवून विनयभंग केल्याचा तसेच चार ते पाच विघार्थीनीचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी दिली असल्याची माहिती मिळताच पालकांनी दिनांक २८ जानेवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास जुन्नर पोलीस ठाण्यात संस्थापक संचालकाविरुध्द तक्रार नोंदविली आहे, हे ही, खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेच्या संस्थापक संचालकांनी पालकांना पैशाचे आमीष दाखवून तक्रार मागे घेण्याचे प्रलोभन दाखविले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित शाळेच्या संस्थापक संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
सदरहू गुन्हा दिनांक २८/०१/२०१८ रोजी दाखल करण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.
याबाबत जुन्नर पोलीस स्टेशनला लेखी किंवा तोंडी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २८/०१/२०१८ रोजी जुन्नर पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. १९/२०१८ भा.दं. वि. कलम ३५४(अ),५०६ बाल लैंगिक अत्याचार कायदा २०१२ चे कलम ८, १२ प्रमाणे गुन्हा नोंदवून अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध २०१५ चे कलम ३(१), (W), १, ३(२) (VA), तसेच भा.दं.वि. कलम ३७६, बाल लैंगिक अत्याचार प्रति. का. कलम ४, ६ ही वाढीव कलमे लावण्यात आली आहे.

सदर गुन्हयात आरोपीस दिनांक २८/०१/२०१८ रोजी अटक करण्यात आली असून आरोपी हा सद्यस्थितीत येरवडा मध्यवर्ती कारागृहात आहे. गुन्हयाचा तपास पूर्ण झाला असून आरोपी विरूध्द मा. न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो रेल्वे प्रकल्पात उल्हासनगरचा समावेश नसल्याबाबत

**(३८) ११२१७३ (१९-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीमध्ये प्रस्तावित ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो रेल प्रकल्प-५ या प्रकल्पाचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियोजनात सदर मेट्रो प्रकल्प उल्हासनदी ओलांडून उल्हासनगरच्या अगदी जवळ येऊन ठेपलेला असतांना प्रकल्पात उल्हासनगरचा समावेश न करता मेट्रो मार्ग परस्पर तळोजाकडे वळविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर येथील उल्लेखनीय औद्योगिक व निवासीय विकासगती, नोकरी, व्यवसाय, व्यापार याकरिता फार मोठ्या संख्येने लोकांचा मुंबई पर्यंत होणारा प्रवास या प्रवासाचा दररोज लोकल ट्रेन व परिवहन मंडळाच्या बसेसवरील बोजा इत्यादी समस्यांवर उपाययोजनेबाबत तसेच सदर प्रकल्पात उल्हासनगरचा समावेश करण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८)** :(१), (२), (३) व (४) ठाणे-भिवंडी-कल्याण परिसरातील वेगाने होणारा विकास लक्षात घेता शासनाच्या निर्देशाप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो मार्ग- ५ ठाणे - भिवंडी - कल्याण या प्रकल्पाचा सल्लागारामार्फत अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये तयार केला. सदर प्रकल्प अहवालास दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १४१ व्या बैठकीत मान्यता मिळाली असून दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासनाने मान्यता दिली आहे.

कल्याण - डोंबिवली या शहरातील वाढती लोकसंख्या व आजूबाजूचा होणारा विकास, विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या २७ गावांचा विकास आराखडा व कल्याण विकास केंद्र तसेच कल्याण - डोंबिवली ही शहरे नवी मुंबई या शहराला जोडण्याची निकड लक्षात घेता प्राधिकरणाने मेट्रो मार्ग- ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) हा मेट्रो मार्ग विस्तारीत करुन कल्याण ते तळोजा (डोंबिवली मार्गे) प्रस्तावित केला आहे.

उल्हासनगर व परिसरातील लोकसंख्या व प्रवाशांची संख्या लक्षात घेता उपनगरीय रेल्वे आणि परिवहन बस सेवा कार्यरत आहे व त्याचा फायदा तेथील जनतेला होत आहे. प्राधिकरणाने सर्वकष प्रकल्प अहवालाचे अद्यावतीकरण करण्याचे काम हाती घेतले असून उल्हासनगर व परिसराबाबत सदर अहवालातील शिफारशीनुसार नियोजनबध्द पध्दतीने पुढील कार्यवाही करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित आहे.

---

### इंदिरानगर (जि.नाशिक) पोलीस ठाण्यात अपुरे पोलीस कर्मचारी कार्यरत असल्याबाबत

**(३९) ११२५५९ (०७-०४-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.नाशिक) पोलीस ठाण्याचे विभाजन करुन दिनांक १ एप्रिल, २०१० रोजी वा त्यासुमारास इंदिरानगर पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र मोठे असल्याने व पूर्वी प्रमाणेच पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या असल्याने तपासावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस ठाण्यात पुरेसे कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे, गृह विभाग शासन निर्णय दिनांक ३१.१२.२००९ अन्वये अंबड पोलीस ठाण्याचे विभाजन करुन इंदिरानगर पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता दिलेले असून दिनांक ०१.०४.२०१० पासून सादर पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यात आलेले आहे.
(२) व (३) इंदिरानगर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन मुंबई नाका पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली असल्याने इंदिरानगर पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र कमी झालेले आहे. तथापि इंदिरानगर पोलीस ठाण्यामध्ये ०८ पोलीस अधिकारी व ९२ पोलीस कर्मचारी असे एकुण १०० पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. तथापि इंदिरानगर पोलीस ठाण्याकरीता आवश्यक असलेले मनुष्यबळ आगामी सार्वत्रीक बदल्यामध्ये पुरविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवनिर्वाचित पालघर जिल्ह्यात पोलीस संख्याबळ, यंत्रसामुग्री तसेच वाहनांमध्ये वाढ करण्याबाबत**

**(४०) ११२६७१ (१६-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवनिर्वाचित पालघर जिल्ह्याची दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी निर्मिती होऊनही अद्यापी पालघर जिल्ह्यात पोलीस संख्याबळ, यंत्रसामुग्री व पोलीस वाहनांमध्ये वाढ करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यात पोलीस संख्याबळ, यंत्रसामुग्री व पोलीस वाहनांमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन दिनांक १ ऑगस्ट, २०१४ पासून पालघर जिल्हा नव्याने कार्यान्वित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने नवनिर्मित पालघर जिल्हा पोलीस दलासाठी पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरुन ३०२० पदे वर्ग करण्यात आली आहेत. तसेच विविध शासन निर्णयान्वये २५८ पदे नव्याने निर्माण करण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीत पालघर जिल्हा पोलीस दलासाठी एकुण ३२७८ पदे मंजूर आहेत.

पालघर जिल्ह्यासाठी पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांच्याकडून १७५ पोलीस मोटार वाहने/बोटी, ३०४ बिनतारी संदेश यंत्रसामुग्री, १०८४ शस्त्रे व १२६६६१ एवढा दारुगोळा वर्ग करण्यात आला आहे. तसेच जिल्हा विभाजनानंतर पालघर जिल्हा पोलीस दलासाठी १०८ पोलीस मोटार वाहने/बोटी, १३९ बिनतारी संदेश यंत्रसामुग्री, ५७४ शस्त्रे व १०४१२४ एवढा दारुगोळा नव्याने मंजूर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जानेफळ (ता.लोणार, जि.बुलढाणा) स्थानिक बसथांबा चौकातील किरणा दुकान फोडून रुपये ७० हजारांचा माल लुटल्याबाबत**

**(४१) ११२९२३ (०७-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जानेफळ (ता.लोणार, जि.बुलढाणा) स्थानिक बसथांबा चौकातील किराणा दुकान फोडून रुपये ७० हजारांचा माल लुटल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणी शासनाने अद्यापर्यंत किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१८) :** (१) होय,

श्रीकांत श्रीनिवास छापररवाल, वय ४२ वर्ष, धंदा किराणा दुकान, रा.जानेफळ यांनी त्यांच्या दुकानातून दि.२४/१/२०१८ रोजी रोख रक्कम व मुद्देमाल मिळून ६९,४००/- रुपयांची चोरी झाल्याची तक्रार दाखल केली आहे.
(२) सदर प्रकरणी अज्ञात आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन जानेफळ येथे गुन्हा क्र.०८/१८ कलम ४६१, ३८० भादवी प्रमाणे दाखल करुन गुन्हा उघडकिस येण्याचे दृष्टीने घटनास्थळास भेट देवून घटनास्थळाची बारकाईने निरीक्षण करुन घटनास्थळ पंचनामा तयार केला. फिर्यादी व साक्षीदार यांचे जबाब नोंदविले. पो.स्टे. हद्दीतील निगराणी बदमाश चेक केले. माहितगार गुन्हेगार यांची घरझडती घेवून जबाब नोंदविले. तसेच गुन्ह्याची पध्दतीवरुन गुन्हेगार सजेशन तपासणी करण्यात येवून जबाब नोंदविण्यात आले. तसेच घटनास्थळाचा डमडाटा काढून सीडीआर चेक केले. परंतू आरोपी अद्याप पावेतो निष्पन्न झाला नाही. गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी शहर (जि.ठाणे) परिसरातील धार्मिक स्थळांवर पालिका प्रशासनाने सुरु केलेली कार्यवाही चुकीची व बेकायदा असल्याबाबत**

**(४२) ११४२३८ (१२-०४-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहर (जि.ठाणे) परिसरातील धार्मिक स्थळांवर पालिका प्रशासनाने सुरु केलेली कार्यवाही चुकीची व बेकायदा असल्याचा आरोप हिंदू मुस्लिम बांधवासह नगरसेवकांनी माहे जानेवारी, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहरात त्यामुळे तणावपुर्ण वातावरण निर्माण झाल्याच्या तक्रारी पोलीस यंत्रणेकरिता तेथील नगरसेवकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सदर घटनेची चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस यंत्रणाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

भिवंडी निजामपुरा शहर महानगर पालिका यांनी अनधिकृत धार्मिक स्थळांची यादी पुन्हा नव्याने तयार केली आहे. शांतता समिती सदस्य, पोलीस मित्र समिती सदस्य, धार्मिक स्थळांचे ट्रस्टी, संस्थपाक, मौलाना, मौलावी, स्थानिक नगरसेवक, प्रतिष्ठीत नागरिक यांची बैठक घेवुन मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार करण्यात येत असलेल्या कारवाईस सहकार्य करण्याचे आवाहन पोलीस विभागामार्फत करण्यात आले. सदर आवाहनास सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयात झालेला रॅगिंगचा प्रकार**

**(४३) ११४५०३ (१४-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयात दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास फ्रेशर्स पार्टीच्या निमित्ताने वरीष्ठ विदयार्थ्यांनी द्वितीय वर्षातील ९ विद्यार्थ्यांना वसतीगृहातील खोलीवर बोलावून मारहाण करीत बळजबरीने दारु पाजण्याचा प्रयत्न केला आहे, हे खरे हे काय,

(२) असल्यास, या रॅगिंग विरोधात या विद्यार्थ्यांनी वजिराबाद पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन रॅगिंग करणा-या विद्यार्थ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) दिनांक २४/१/२०१८ रोजी नांदेड येथील शासकीय आयुर्वेदिक महाविदयालयातील बी ए एम एस च्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना सिनियर विद्यार्थ्यांनी रॅगिंगच्या नावाखाली वसतीगृहाच्या एका रूममध्ये बंद करून त्यांच्या तोंडावर सिगारेटचा धूर टाकत असल्याबाबतची तक्रार १० विद्यार्थ्यांनी दिली होती.
(२) होय.
(३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून वजिराबाद पोलीस स्टेशन नांदेड यांनी अध्यक्ष, अॅन्टी रॅगिंग चौकशी समिती शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय नांदेड तथा अधिष्ठाता शासकीय आयुर्वेद महाविदयालय नांदेड यांना सदरच्या तक्रारीची चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

सदरच्या चौकशीत दोषी आढळून आलेल्या ११ दोषी विद्यार्थी यांचे विरूध्द आयुर्वेदीक महाविद्यालय वसतीगृह परिसरात येण्या जाण्यास प्रतिबंध घालण्यात आला, सदर प्रकरणी त्याच्या पालकांना बोलावून पालकांना समक्ष समज देण्यात आली आहे. तसेच अनुशासनात्मक कार्यवाही अधिष्ठाता शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय नांदेड तथा अध्यक्ष अॅन्टी रॅगिंग समिती शासकीय आयुर्वेद महाविद्यालय यांचेकडून करण्यात येऊन सदरचे प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक शहरात आधार कार्ड दुरुस्तीसाठी व नवीन आधारकार्ड नोंदणीसाठी पैशांची मागणी होत असल्याबाबत

**(४४) ११४८२१ (१८-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात आधार कार्डवरील दुरुस्तीसाठी आधार कार्ड केंद्र चालकांकडून पैशांची मागणी होत असल्याचा गंभीर प्रकार माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आधार कार्ड दुरुस्ती व नोंदणीसाठी शासनाने निकष ठरवुन दिलेले असतांनाही नागरिकांना आधार कार्ड केंद्र चालकांकडून आमदारांच्या रहिवाशी दाखल्याची मागणी करुन अडवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आधारकार्ड केंद्र चालकांच्या कारभाराला जिल्हा प्रशासनाचे नियंत्रण नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करून दोषी आधार कार्ड केंद्र चालकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

शासनाने निकष ठरवून दिल्याप्रमाणे कामकाज करण्याबाबत संबंधित आधार केंद्र चालकांना जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडून सुचना देण्यात आल्या असून त्यानुसार सुचनांची अंमलबजावणी केली जाते.

(३) हे खरे नाही

(४) माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी नाशिक यांनी केलेल्या कारवाईत तीन आधार केंद्र चालक दोषी आढळून आले व या तीन आधार केंद्र चालकांची आधार केंद्रे जिल्हाधिकारी नाशिक यांनी बंद करुन त्यांना Black List करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती महानगरपालिकेतील विविध विभागातील माहितीचे डिजीलायजेशन करुन GIS डाटाबेस तयार करण्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४५) ११५४१२ (१२-०४-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेतील विविध विभागातील माहितीचे डिजीटीलायजेशन करुन GIS डाटाबेस तयार करण्यास्तव दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी सायबर टेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेअर कंपनीशी करार करण्यात आला होता परंतू करारानुरुप कार्य न करता त्यामध्ये आर्थिक अनियमितता झाल्याप्रकरणी आयुक्त, महानगरपालिका यांचे दिनांक २ जून, २०१७ आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदारास काम पुर्ण न करता देयक अदा करण्यात आल्यामुळे आर्थिक अनियमितता झाल्याचे चौकशी समितीद्वारे दिनांक २५ जानेवारी, २०१८ च्या अंतिम चौकशी अहवालामध्ये नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) चौकशी अहवालाच्या आधारे, विषयांकित कामाचा महानगरपालिकेस उपयोग होईल अशा पध्दतीने काम पूर्ण करुन द्यावे अथवा उक्त कामापोटी महानगरपालिकेतर्फे कंपनीस अदा करण्यात आलेली संपूर्ण रक्कम परत करावी अशी नोटीस दिनांक १६/०२/२०१८ रोजी संबंधीत कंपनीस देण्यात आलेली होती.

तथापि, कंपनीने यास कोणताही प्रतिसाद दिलेला नसल्याने, कंपनीबरोबर झालेल्या करारातील तरतुदीनुसार, प्रस्तुत प्रकरणी लवाद नियुक्त करण्याबाबत प्रशासकीय मान्यता झालेली असून, त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

निविदा प्रक्रियेच्या सुरुवातीपासून या कामाशी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

असे आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

---

**धुळे शहरात विविध ठिकाणी अवैध सट्टा जुगार मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत**

**(४६) ११५४७५ (१२-०४-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरात विविध ठिकाणी अवैध सट्टा जुगार मोठ्या प्रमाणात सुरु असुनही पोलीस याकडे दुर्लक्ष करीत असल्याने जुगार व सट्ट्यात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उघडपणे सुरु असलेला अवैध जुगार व सट्टा बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१८) :** (१) व (२)

धुळे शहरात अवैध सट्टा जुगार चालु असल्याबाबत ज्या ज्या वेळी पोलीसांना निदर्शनास आले अथवा गोपनीय बातमीदारांकडून बातमी मिळाल्यानंतर पोलीसांनी परिणामकारक असे छापे टाकुन सन २०१७ मध्ये धुळे शहरात एकुण ३४० जुगाराच्या केसेस करण्यात येवुन, त्यात ६३० आरोपीतांना अटक करुन, त्यांचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पाठविण्यात आले आहे. सन २०१७ मध्ये दाखल जुगाराच्या केसेस मध्ये एकुण २१,००,४२९/- रुपयाचा रोख रक्कम व साधने असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

पोलीसांनी अवैध जुगार व सट्टा पेढीवर परिणामकारक असे एकुण ५५ छापे टाकले असुन, त्यात ६५ आरोपीतांना अटक करण्यात येवुन त्याचे कडुन एकुण ३५,६५६/- रुपये रोख व साधने जप्त करण्यात आले आहे.

(३) विलंब झालेला नाही

---

**"आपले सरकार" पोर्टलवर अनेक तक्रारी प्रलंबित असल्याबाबत**

**(४७) ११५४९३ (१८-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या “आपले सरकार” पोर्टलवर गत सहा महिन्यांपासून अनेक तक्रारी प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, “आपले सरकार“ पोर्टल वरील तक्रारींच्या निपटारा लवकरात लवकर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१८) :** (१) व (२) “आपले सरकार” पोर्टलवर नोंदविलेल्या एकुण तक्रारींपैकी १५% तक्रारी माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये पोर्टलवर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले.

त्यानुषंगाने “आपले सरकार” तक्रार निवारण प्रणालीबाबत प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक सूचना सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.८२/ कार्या १८ (र.व का.), दिनांक २४ मे, २०१८ अन्वये सर्व मंत्रालयीन विभागांना देण्यात आल्या आहेत.

माहे जून, २०१८ मध्ये (दि.१९ जून,२०१८ रोजी) “आपले सरकार” तक्रार निवारण प्रणालीवर १२% तक्रारी प्रलंबित आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र सरकारने उत्पादनावर २८ टक्के जीएसटी लागु केल्यामुळे कारखानदारांनी विडी उत्पादन कमी केल्यामुळे त्याचा परिणाम विडी कामगारांच्या वेतनावर पडल्याबाबत**

**(४८) ११५९९६ (०८-०५-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने उत्पादनावर २८ टक्के जीएसटी लागु केल्यामुळे कारखानदारांनी विडी उत्पादन कमी केल्यामुळे त्याचा परिणाम विडी कामगारांच्या वेतनावर होवून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यातच सन २०१४ पासून विडी कामगारांना एपीएल योजनेतून मिळणारा धान्यपुरवठा बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विडी कामगार आर्थिक व सामाजिकदृष्टया दुर्बल घटक असल्याचे मान्य करीत तेलगंणा सरकारने त्यांना जीवनभृती आधारभत्ता योजना लागू केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विडी कामगारांची दयनीय स्थिती लक्षात घेता विडी कामारांना एपीएल योजनेतून धान्यपुरवठा सुरु करण्यासोबतच त्यांना तेलंगणा सरकारची सदर योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही,
सदर प्रकरणी नमूद बाबीमुळे विडी कामगारांच्या वेतनावर परिणाम होवून उपासमारीची वेळ आल्याबाबतचे कोणतेही निवेदन कामगार आयुक्त कार्यालयांतर्गतच्या विभागीय कार्यालयांना प्राप्त झालेले नाही, असा कामगार आयुक्तालयाचा अहवाल आहे.
(२) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजनेच्या सर्व शिधापत्रिकाधारकांचा व बीपीएलच्या सर्व शिधापत्रिकाधारकांचा तसेच, एपीएल (केशरी) मधील शहरी भागात रु.५९,०००/- व ग्रामीण भागात रु.४४,०००/- कमाल वार्षिक उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांच्या प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे. सदर अधिनियमांतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो. सदर अधिनियमांतर्गत विडी व्यवसायातील कामगारांना अन्नधान्य देण्याबाबतची कोणतीही स्वतंत्र तरतूद नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम नगर परिषदेची परवानगी न घेता शहरातील जुन्या आययूडीपी कॉलनीमध्ये खोदकाम करुन त्यात फायबर पाइप टाकणा-या मालाड येथील भारतीय एअरटेल सर्व्हिसेस लिमिटेड या कंपनीवर गुन्हा दाखल केल्याबाबत

**(४९) ११६०२१ (१४-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम नगर परिषदेची कुठलीही परवानगी न घेता रुपये ७ लाख ४ हजार ३७० एवढे शूल्क अदा न करता शहरातील जुन्या आययूडीपी कॉलनीमध्ये खोदकाम करुन त्यात फायबर पाइप टाकणा-या मालाड येथील भारतीय एअरटेल सर्व्हिसेस लिमिटेड या कंपनीवर दिनांक २९ जानेवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

वाशिम नगर परिषदेची कुठलीही परवानगी न घेता ७,०४,३७०/- रुपये एवढे शूल्क अदा न करता शहरातील जुन्या आय.यू.डी.पी. कॉलनीमध्ये खोदकाम करुन त्यात फायबर पाइप टाकणाऱ्या मालाड येथील भारती एअरटेल सर्व्हिसेस लिमिटेड या कंपनीवर दि.३०१.२०१८ रोजी पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे अप.क्र.४५/२०१८ कलम ४४७, २८७, ३३६, ४३१, ४२७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.
(२) चौकशीमध्ये नगरपरिषद, वाशिम यांनी, भारती एअरटेल सर्व्हिसेस लिमीटेड कंपनी, मालाड, मुंबई यांना आय.यु.डी.पी. कॉलनी, वाशिम येथे खोदकाम करण्याची परवानगी न दिल्याबाबत, अहवाल दिलेला आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जेनॉम बायोटेक प्रा. लि. कंपनी, माळेगाव औद्योगिक वसाहत, (ता.सिन्नर, जि.नाशिक) यांनी कंपनीतील ३२ कर्मचाऱ्यांचे वेतन थकविल्याबाबत

**(५०) ११६२९५ (१४-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळेगाव औद्योगिक वसाहत (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील जेनॉम बायोटेक प्रा. लि. कंपनीने कायमस्वरूपी कार्यरत असलेल्या ३२ कर्मचा-यांचे माहे मार्च २०१७ पासूनचे थकीत वेतन मिळण्यासाठी जेनॉम बायोटेक एम्पलॉईज युनियन यांनी कामगार आयुक्त, नाशिक यांना दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना उदरनिर्वाह करणे अशक्यप्राय झाल्याने थकीत वेतन अदा करण्यासाठी तत्काळ आदेश देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. कामगार मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१८-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी मा. कामगार मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(३) कामगार उप आयुक्त, नाशिक कार्यालयाने उभय पक्षांच्या बैठका आयोजित करुन थकीत वेतन अदा करावे, यासाठी व्यवस्थापनाकडे पाठपुरावा केला असून व्यवस्थापनाने मार्च, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत वेतन अदा केले. तथापि, त्यानंतरच्या कालावधीतील वेतन सदर कार्यालयाने पाठपुरावा करुनही विहीत वेळेत अदा न केल्यामुळे किमान वेतन अधिनियम, १९४८ व वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत व्यवस्थापनाविरुध्द २ खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच या कामी उक्त कार्यालय अद्यापही प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.